# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

आणि

## पर्यावरण आणि भू-विज्ञान प्रशाळा,

**कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

# “भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळा”

**मंगळवार , दि. २० जानेवारी २०२६, वेळ : स. १०.३० वा. ते सायं. ५.३० वा.**

**स्थळ : पर्यावरण आणि भू-विज्ञान प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**






**नोंदणीसाठी दुवा :**

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSczQgt4Da9eBxpZZ6FkzHM40zHg4iMUhhCXZ8JiDCTPkGzx5A/viewform?usp=header

टीप: कार्यशाळेच्या सहभागासाठीची आपली नोंदणी कृपया गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ पर्यंत करावी.

# “भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळा”

**स्थळ : पर्यावरण आणि भू-विज्ञान प्रशाळा,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

महोदय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ हा महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. या मंडळाचा एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे सर्वविषयसंग्राहक असा मराठी विश्वकोश. हा मराठीतील संदर्भकोश असून यात मानव्य व विज्ञान विषयाच्या विविध शाखा, संकल्पना, महत्त्वाचे विचारप्रवाह आणि महत्त्वाचे चरित्रे नोंदींच्या स्वरूपात समाविष्ट करण्यात आलेले आहे. यात महाराष्ट्र, भारत आणि जागतिक स्तरांवरील सामान्य वाचक, अभ्यासक, विद्यार्थी आणि संशोधक यांच्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या व्यक्ती, घटना, संकल्पना, स्थळे, संस्था इत्यादीबाबतची विश्वासार्ह माहिती नोंद स्वरूपात दिली आहे. मराठी भाषेचा प्रचार - प्रसार करणे, जिज्ञासू वाचकांना मराठीत विचार करण्यास व लेखनास प्रवृत्त करणे, संदर्भकोशाचा अधिकाधिक वापर करणे हा मराठी विश्वकोश निर्मिती मागील प्रमुख हेतू आहे. मराठी वर्णमालेप्रमाणे अकारविल्हे अ ते ज्ञ (अंक ते ज्ञेयवाद) रचलेल्या मराठी विश्वकोशाचे एकूण २० खंड प्रसिद्ध असून त्यात सु. १८ हजार नोंदींचा समावेश आहे. मराठी विश्वकोशाचा आवाका प्रचंड असल्याने प्रत्येक खंडात अनेक ज्ञानशाखांचा समावेश करण्यात आला आहे. विश्वकोशाने अशा प्रकारे प्रथम आवृत्ती प्रकाशित करून एक टप्पा पूर्ण केलेला आहे. ज्ञान शाखांचा वाढता विस्तार लक्षात घेता अशा संदर्भग्रंथाचे ज्ञान सातत्याने अद्ययावत ठेवत वाचकांची जिज्ञासा जागृत ठेवणे गरजेचे असल्याने मंडळाने पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाल्यानंतर नव्या तंत्रज्ञानाच्या आधारे आपल्या कार्यपद्धतीत बदल केला. विषयनिहाय स्वतंत्र ज्ञानमंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेत तज्ज्ञ लेखकांचा शोध घेऊन त्यांना ज्ञानमंडळातील नोंदींचे लेखन करण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे. त्यासाठी नवलेखक, शिक्षक व प्राध्यापक यांना मराठी विश्वकोश कार्य, संकल्पना व स्वरूप याचा परिचय व्हावा आणि नोंदीचे वस्तुनिष्ठ लेखन व्हावे, या हेतूने मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते ५.३० या वेळेत पर्यावरण आणि भू-विज्ञान प्रशाळा, कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे एक दिवसीय भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. भूविज्ञान विषयाचे स्वरूप अतिशय जटिल आणि व्यापक असून, वास्तवशास्त्र (Reality), भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), जीवशास्त्र (Biology) व गणित (Mathematics) या मूलभूत विज्ञानांच्या ज्ञानाच्या आधारावरच भूविज्ञानाची उभारणी झाली आहे. भूविज्ञानाचे प्राकृतिक व इतिहासात्मक असे दोन प्रमुख विभाग करण्यात येत असत. परंतु आता या विभागांचे अनेक उपविभाग करण्यात येतात व या प्रत्येक उपविभागाची स्वतंत्र विज्ञान शाखा बनली आहे. यांपैकी एकमेकांत सरमिसळ होत असल्याने त्यांच्यातील काटेकोर सीमारेषा ठरविणे अवघड आहे. शिवाय काही शाखांचा इतर विज्ञानांशीही संबंध येतो. या सर्व विषयांची साधकबाधक चर्चा करून भूविज्ञान ज्ञानमंडळाच्या माध्यमातून विश्वकोशामधील नवीन नोंदींचे लेखन व जुन्या नोंदींचे अद्ययावत पुनर्लेखन व्हावे, तसेच भूविज्ञान विषयाचे योग्य व परिपूर्ण ज्ञान सर्व ज्ञानार्थी, विद्यार्थी व समाजापर्यंत योग्य तऱ्हेने पोहोचविण्यासाठी हा ज्ञानयज्ञ आहे. त्यासाठी भूविज्ञान प्रेमी, जाणकार लेखक तसेच नवीन सहयोगी होऊ इच्छिणारे तरुण व संशोधक लेखक यांना आग्रहपूर्वक या कामासाठी आम्ही आमंत्रित करीत आहोत. भूविज्ञानाच्या या ज्ञानयज्ञामध्ये आपण सर्वांनी यजमान पद घेऊन हे काम यशस्वी करून दाखवायचे आहे. मराठी विश्वकोश प्रथम आवृत्तीच्या माध्यमातून सु. ३० - ४० वर्षांपूर्वी आपल्या ज्येष्ठ व श्रेष्ठ अशा गुरुजनवर्गाने व संशोधकांनी हा ज्ञानयज्ञ सुरू केलेला होता. त्याचे अद्ययावत व नूतनीकरण आपल्याला करायचे आहे. नव्हे, ती आपली जबाबदारी आहे. हे विशेषत्वाचे काम कोणा एकट्याचे असू शकत नाही, त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावयाचे आहे. आपापल्या आवडीप्रमाणे व विशेष अध्ययनाच्या निवडीप्रमाणे सर्वांकडून योगदान अपेक्षित आहे. त्यासाठी आपण सर्वांनी कार्यशाळेच्या निमित्ताने एकत्र येऊ या, विचारमंथन करू या व हा भूविज्ञानाचा ज्ञानयज्ञ निरंतर तेवत ठेवू या.

“भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळा”
स्थळ : पर्यावरण आणि भू-विज्ञान प्रशाळा,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# “भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळा”

स्थळ : पर्यावरण आणि भू-विज्ञान प्रशाळा,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

| दिनांक | वेळ | कार्यशाळा रूपरेषा |
|---|---|---|
| २० जानेवारी २०२६; मंगळवार | १०.३० - ११.०० | नावनोंदणी व चहापान |
| | ११.०० - ११.४५ | **उद्घाटनसत्र**<br>प्रा. डॉ. एस. टी. इंगळे (प्र-कुलगुरू, कबचौउमवि,जळगाव) / डॉ विनोद पाटील कुलसचिव, कबचौउमवि,जळगाव/ प्रा. डॉ. सं. ना. पाटील (संचालक, पर्यावरण आणि भू-विज्ञान प्रशाळा, कबचौउमवि,जळगाव) आणि उपस्थित मान्यवर.... |
| | | सत्र : १ |
| | ११.४५ - १.१५ | **मराठी विश्वकोश नोंदींचे महत्त्व:**<br>मा. प्रा. डॉ. पी. एस. कुलकर्णी<br>(साधन व्यक्ति , भूविज्ञान ज्ञानमंडळ) |
| | | (१.१५ - २.१५) भोजन |
| | २.१५ - ०३.४५ | **मराठी विश्वकोश आणि भूविज्ञानविषयक कोशीय लेखन:**<br>मा. प्रा. डॉ. एस. के. वडगबाळकर<br>(माजी समन्वयक, भूविज्ञान ज्ञानमंडळ) |
| | ३.४५ - ०४.३० | **खुली चर्चा व प्रशिक्षणार्थींचे मनोगत:**<br>सूत्रनिवेदन : रवीन्द्र घोडराज<br>(विद्याव्यासंगी सहायक, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ) |
| | ४.३० - ५.३० | **समारोपसत्र** |

**प्रा. डॉ. वि. एल. माहेश्वरी**
कुलगुरू, कबचौ उमवि,जळगाव

**प्रा. डॉ. एस. टी. इंगळे**
प्र-कुलगुरू, कबचौ उमवि,जळगाव

**डॉ विनोद पाटील**
कुलसचिव, कबचौ उमवि,जळगाव

## आयोजन समिती

मा. रवीन्द्र घोडराज
(विद्याव्यासंगी सहायक, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)
मा. प्रा. डॉ. एस. के. वडगबाळकर
(माजी समन्वयक, भूविज्ञान ज्ञानमंडळ)
प्रा. डॉ. सं. ना. पाटील
(समन्वयक, भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळा)
संचालक, पर्यावरण आणि भू-विज्ञान प्रशाळा

## स्थानिक आयोजन समिती

प्रा. डॉ. स. रा. थोरात
(वरिष्ठ प्राध्यापक)
प्रा. डॉ. स. ब. अत्तरदे
(प्राध्यापक तथा विभागप्रमुख)
प्रा. डॉ. वि. मा. रोकडे
(प्राध्यापक तथा विभागप्रमुख)
डॉ. क. प. दांडगे
(सहयोगी प्राध्यापक)
डॉ. योगेश महाजन
(सहाय्यक प्राध्यापक)
डॉ. भावेश पाटील
(सहाय्यक प्राध्यापक)
प्रा. निलेश पाटील
(सहाय्यक प्राध्यापक)
प्रा. राजेंद्र तायडे
(सहाय्यक प्राध्यापक)










**पर्यावरण आणि भू-विज्ञान प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

अधिक माहितीसाठी संपर्क:
९४२३९३७४००/ ९४२३५१६६४१/ ९८९०६२७९००

**नोंदणीसाठी दुवा**: https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSczQgt4Da9eBxpZZ6FkzHM40zHg4iMUhhCXZ8JiDCTPkGzx5A/viewform?usp=header